PRGI/RNI: MHMAR/26/A8144

मी मराठी मंच

॥ आवाज महाराष्ट्राचा ॥

● वर्ष : ०१ ● अंक : ०६ | ● शुक्रवार, दि. ०६ नोव्हेंबर २०२६ ते १२ नोव्हेंबर २०२६ | ● पृष्ठ : ०८ ● किंमत : ५रु.

एसटीच्या ८३ हजार कर्मचाऱ्यांना १० हजार रुपये दिवाळी भेट; परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची घोषणा

पात्र कर्मचाऱ्यांना १२, ५०० रुपये सण उचल; महागाई भत्ता ६० टक्क्यांवर

मुंबई :

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) ८३ हजार अधिकारी व कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड करण्यासाठी प्रत्येकी १० हजार रुपये सानुग्रह अनुदान, पात्र कर्मचाऱ्यांना १२, ५०० रुपये सण उचल आणि महागाई भत्ता ५८ टक्क्यांवरून ६० टक्के करण्याचा महत्वपूर्ण निर्णय परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष



प्रताप सरनाईक यांनी जाहीर केला.

एसटी महामंडळातील विविध कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींसोबत झालेल्या बैठकीत हा निर्णय जाहीर करण्यात आला. महामंडळ आर्थिक अडचणींचा सामना करत असतानाही कर्मचाऱ्यांच्या दिवाळीचा आनंद हिरावून घेता येणार नाही, अशी ठाम भूमिका मंत्री सरनाईक यांनी यावेळी मांडली. "एसटीचे अधिकारी आणि कर्मचारी अहोरात्र मेहनत करून लाखो प्रवाशांना सुरक्षित प्रवासाची सेवा देतात. त्यांच्या कष्टाची जाणीव ठेवून दिवाळीच्या सणानिमित्त त्यांना सानुग्रह अनुदान देणे हे केवळ औदार्य नसून त्यांचा हक्क आहे. या निर्णयामुळे महामंडळावर सुमारे १६० कोटी रुपयांचा आर्थिक भार पडणार असला, तरी कर्मचाऱ्यांची दिवाळी आनंदात साजरी व्हावी, हे आमचे कर्तव्य आहे," असे प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या खंबीर पाठबळामुळे एसटी महामंडळाचे भविष्य उज्ज्वल असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. एसटी कर्मचाऱ्यांनी आंदोलन अथवा करू नये, असे आवाहन मंत्री सरनाईक यांनी केले.

नवी मुंबईकरांना दिलासा: पुढील २० वर्षे निवासी मालमत्तांवर करवाढ नाही

नवी मुंबई :

नवी मुंबईतील निवासी इमारतींवरील घरपट्टी आणि पाणीपट्टीत पुढील २० वर्षे कोणतीही वाढ होऊ देणार नाही, अशी महत्त्वपूर्ण ग्वाही वनमंत्री गणेश नाईक यांनी दिली. मात्र, शहरातील हॉटेल्स, दुकाने, आयटी केंद्रे आणि डेटा सेंटर यांसारख्या व्यावसायिक आस्थापनांवर वाढीव कर आकारला जाईल, असे स्पष्ट करत त्यांनी महापालिकेच्या महसूल



वाढीचा आणि अनियंत्रित नागरीकरणाला आळा घालण्याचा रोडमॅप मांडला. वाशी येथील सिडको प्रदर्शन केंद्रात श्रमिक सेना युनियनतर्फे आयोजित 'वचनपूर्ती कामगार मेळाव्यात' गणेश नाईक बोलत होते. महापालिकेतील कंत्राटी कामगारांना ४५ हजार रुपयांचे दिवाळी सानुग्रह अनुदान आणि ७, ५०० रुपयांचा विशेष लाभ दिल्याबद्दल त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. नाईक यांनी स्पष्ट केले की, सर्वसामान्यांवर करवाढ न लादता कामगारांचे कल्याण आणि शहराचा दर्जेदार विकास साधला जाईल. व्यावसायिक मालमत्तांच्या करवाढीचे स्वरूप लवकरच निश्चित केले जाईल.

मुंबईत प्रदूषणाचा वाढता विळखा; MMRDA ला दंडात्मक कारवाईचे आदेश

मुंबई :

मुंबईतील वायुप्रदूषणाचा प्रश्न पुन्हा गंभीर बनला असून, शहरातील अनेक भागांमध्ये हवेची गुणवत्ता खालावली आहे. काही ठिकाणी हवेचा गुणवत्ता निर्देशांक (AQI) १६० च्या पुढे गेल्याने मुंबईकरांच्या आरोग्याची चिंता वाढली आहे. दरम्यान, मुंबईतील वाढत्या प्रदूषणाला मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (MMRDA) विकासप्रकल्पांमधून पसरणारी धूळ, माती आणि राडारोडा कारणीभूत असल्याचे उच्च न्यायालयाच्या समितीने निदर्शनास आणून दिले आहे. वारंवार लक्ष वेधूनही संबंधितांवर



कारवाई होत नसल्याबद्दल समितीने नाराजी व्यक्त केली असून, जबाबदार व्यक्ती आणि संबंधितांवर तातडीने दंडात्मक कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.



डॉक्टर म्हणून समाजाचा विश्वास संपादन करणे ही खरी कमाई – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

राज्याच्या आरोग्य सेवेत १ हजार ४४० एमबीबीएस डॉक्टर दाखल; आणखी ६२१ डॉक्टरांची भरती होणार

मुंबई : डॉक्टर होणे ही पदवी असली, तरी डॉक्टर म्हणून समाजाचा विश्वास संपादन करणे ही खरी कमाई आहे. प्रत्येक रुग्ण वेदना आणि चिंता घेऊन रुग्णालयात येतो. उपचारानंतर तो समाधानाने घरी परतणे, हेच डॉक्टरांच्या सेवेचे यश आहे. त्यामुळे डॉक्टरांनी समर्पण, सेवाभाव, रुग्णसंवाद आणि संवेदनशीलतेने काम करावे असे आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत १४४० नवनियुक्त वैद्यकिय अधिकारी यांना



नियुक्तीपत्रे वितरण समारंभ यशवंतराव चव्हाण सेंटर येथे झाला. यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते. यावेळी विधानपरिषद उपसभापती सचिन अहीर, आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, राज्यमंत्री मेघना साकोरे- बोर्डीकर, कुपोषण टास्क फोर्सचे अध्यक्ष डॉ. दिपक सावंत, खासदार संजय जाधव, खासदार धैर्यशील माने, आमदार मनीषा कायंदे, प्रधान सचिव डॉ. निपूण विनायक, आयुक्त डॉ. संजय काटकर, आयुक्त सुनील भोकरे, संचालक डॉ. नितीन अंबाडेकर, संचालक डॉ. विजय कंदेवाड उपस्थित होते.

आरोग्य विभागासाठी हा ऐतिहासिक दिवस असल्याचे सांगून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नव्याने रुजू झालेल्या डॉक्टरांचे अभिनंदन केले. ते म्हणाले, या डॉक्टरांमध्ये सुमारे ७०० महिला डॉक्टरांचा समावेश आहे. आरोग्य विभागाने ही भरती प्रक्रिया पारदर्शकपणे आणि गुणवत्तेच्या आधारे पूर्ण केली आहे. त्यामुळे डॉक्टरांची कमतरता असलेल्या भागांतील आरोग्य सेवा बळकट होण्यास मदत होईल.

राज्याच्या आरोग्य सेवेत एकाच वेळी १ हजार ४४० एमबीबीएस डॉक्टर दाखल झाल्यामुळे ग्रामीण आणि दुर्गम भागातील आरोग्य सेवा अधिक सक्षम होणार आहे. आणखी ६२१ डॉक्टरांची भरती करण्यात येणार असून, गरजू रुग्णाला उपचार मिळाला पाहिजे यासाठी शासनाचे प्रयत्न आहेत असेही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा देण्यासाठी डॉक्टरांची पुरेशी उपलब्धता आवश्यक आहे. त्याचबरोबर डॉक्टरांना चांगले निवासस्थान, स्वच्छ व सुरक्षित परिसर, विरंगुळा आणि क्रीडा सुविधा उपलब्ध करून देणे ही शासनाची जबाबदारी आहे. डॉक्टरांवर रुग्णसेवेचा मोठा ताण असतो. त्यामुळे त्यांच्या कामासाठी पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी आवश्यक निधी कमी पडू दिला जाणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिली.

राज्यस्तरीय शालेय कबड्डी स्पर्धेत कोल्हापूर विभाग प्रथम

अमरावती द्वितीय तर मुंबई शहर तृतीय

मुंबई : राज्यस्तरीय शालेय कबड्डी क्रीडा स्पर्धा २०२६-२७ चे क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषदआणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय मुंबई शहर यांनी आयोजन केले होते. या स्पर्धेत कोल्हापूर विभागाने प्रथम, अमरावती विभागाने द्वितीय, तर मुंबई शहर विभागाने तृतीय क्रमांक पटकावला असल्याची माहिती मुंबई शहरच्या जिल्हा क्रिडा अधिकारी निलिमा अडसूळ यांनी पत्रकाद्वारे दिली.

१४ वर्षाआतील मुलींच्या राज्यस्तरीय शालेय कबड्डी क्रीडा स्पर्धा २०२६-२७ भारतरत्न राजीव गांधी जिल्हा क्रीडा संकुल, धारावी येथे १ ते ४ नोव्हेंबरदरम्यान उत्साहात संपन्न झाली. या स्पर्धेत महाराष्ट्रातील अमरावती, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर, लातूर, मुंबई, नागपूर, नाशिक आणि पुणे या आठ विभागांतील सुमारे १४० खेळाडूंनी सहभाग घेतला. स्पर्धेचे उद्घाटन आंतरराष्ट्रीय पॉवरलिफ्टर व शिवछत्रपती पुरस्कारार्थी संदीप आवारी यांच्या हस्ते झाले. यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी नीलिमा अडसूळ उपस्थित होत्या. आस्था सिंग आणि प्रज्ञा खाडे यांनी क्रीडा ज्योत घेऊन मैदानात प्रवेश केला. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते क्रीडा ज्योत प्रज्वलित करण्यात आली. यानंतर खेळाडूंनी क्रीडा शपथ घेतली.

या स्पर्धेच्या अनुषंगाने हरियाणा, दादरी येथे होणाऱ्या राष्ट्रीय शालेय कबड्डी स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या १४ वर्षाआतील मुलींच्या संघाची निवड करण्यात आली. आठही विभागांतील सुमारे ४० खेळाडूंच्या निवड चाचणीतून १८ खेळाडूंची राज्य संघासाठी निवड करण्यात आली. निवड झालेल्या खेळाडूंमध्ये कोल्हापूरच्या अस्मिता यादव, प्रिया ज्योतीराम गोरुले, सई निवारण निकम आणि विभावरी उमेश पाटील; वाशिमच्या कीर्ती संजय पुजारी आणि निशा दत्तात्रय मुधाळे; ठाण्याच्या सिद्धी योगेश म्हात्रे; धाराशिवच्या मयूरी अतुल इंगळे; नाशिकच्या आरोही कृष्णा शिंदे; छत्रपती संभाजीनगरच्या माधवी बाळू गायकवाड आणि ज्योती दत्ता कोंडेवाल; तसेच पुण्याच्या आराध्या कृष्णकांत भोसले यांचा समावेश आहे.

राज्यातील भरती परीक्षा सुधारणांसाठी गठित उच्चस्तरीय समितीचा अंतरिम अहवाल शासनास सादर

मुंबई : राज्यातील भरती परीक्षा प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुरक्षित व विश्वासार्ह करण्याच्या उद्देशाने शासन निर्णय दिनांक ४ सप्टेंबर २०२६ अन्वये उच्चस्तरीय समिती गठित करण्यात आली आहे. या समितीने राज्यातील विविध विभागांमधील विद्यार्थी व संबंधित हितधारकांशी केलेल्या सल्ला मसलतीदरम्यान प्राप्त मागण्या, सूचना व अभिप्रायांचा अभ्यास केला आहे.

विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या काही महत्त्वाच्या व तातडीच्या मुद्यांवर प्राधान्याने निर्णय घेणे आवश्यक असल्याने समितीने अंतरिम अहवाल शासनास सादर केला आहे.

या परीक्षेसाठी सुमारे १२ लाख उमेदवारांनी अर्ज केले असून सध्यास्थितीत ५ हजाराहून अधिक पदांसाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. विविध विभागांकडून आणखी ११ हजाराहून अधिक पदांची मागणी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे पाठविण्यात आली आहे. ही अतिरिक्त पदे शुद्धिपत्रकाद्वारे समाविष्ट करून एकूण पदसंख्या १६ हजारापेक्षा अधिक करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

उमेदवारांच्या मागण्यांचा विचार करून कमाल वयोमर्यादेत एक वेळची विशेष बाब म्हणून एक वर्षाची सवलत देण्याची शिफारस करण्यात आली आहे. ही सवलत दिनांक १ जानेवारी २०२६ नंतर प्रसिद्ध झालेल्या व निवड प्रक्रिया सुरू न झालेल्या सर्व जाहिराती, तसेच दिनांक ३१ डिसेंबर २०२७ पर्यंत प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींसाठी लागू राहील. तसेच, गट-क परीक्षा २०२६ परीक्षेसाठी अतिरिक्त पदांकरीता व वयोमर्यादा सवलतीमुळे पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना संधी मिळावी यासाठी अर्ज प्रक्रिया एकदा पुन्हा सुरू करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

महिनाभरात पैसे दुप्पट करण्याचे आमिष; पनवेलमध्ये चौघांना ७२.९८ लाखांचा गंडा

पनवेल : गुंतवणुकीची रक्कम महिनाभरात दुप्पट करून देण्याचे आमिष दाखवून चार जणांची ७२ लाख ९८ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार पनवेलमध्ये उघडकीस आला आहे. उरण तालुक्यातील जेएनपीटी टाऊनशिप, पिरकोन आणि करंजा परिसरातील रहिवाशांनी याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात बुधवारी तक्रार दाखल केली. काही दिवसांत गुंतवणुकीवर मोठा परतावा मिळेल, या आश्वासनावर विश्वास ठेवून संबंधितांनी लाखो रुपये गुंतवले होते. पनवेल शहर पोलिसांत दाखल तक्रारीनुसार, कोप्रोली येथे राहणाऱ्या ३२ वर्षीय महिलेने ही फसवणूक केली आहे. पनवेल शहरातील ओरियन मॉलमध्ये या महिलेने पहिल्या गुंतवणूकदाराची भेट घेऊन महिन्याभरात गुंतवलेली रक्कम दुप्पट करून देण्याचे आश्वासन दिले. तसेच गुंतवलेली मूळ रक्कम सुरक्षित राहील, असेही तिने भासवले. या आश्वासनावर विश्वास ठेवून उरण तालुक्यातील कोंढरीपाडा (करंजा) येथील ३१ वर्षीय व्यक्तीने ८ सप्टेंबर रोजी चार लाख रुपये, तर ९ सप्टेंबर रोजी ९८ हजार रुपये गुंतवले. त्यानंतर आणखी तीन व्यक्तींनीही या महिलेच्या योजनेत लाखो रुपयांची गुंतवणूक केली. अशा प्रकारे चार गुंतवणूकदारांकडून एकूण ७२ लाख ९८ हजार रुपये स्वीकारण्यात आले. महिनाभराचा कालावधी उलटूनही आश्वासनानुसार परतावा मिळाला नाही. त्यामुळे गुंतवणूकदारांनी मूळ रक्कम परत मागण्यास सुरुवात केली. मात्र, संबंधित महिला टाळाटाळ करू लागल्याने आपली फसवणूक झाल्याचा संशय गुंतवणूकदारांना आला. त्यानंतर त्यांनी पोलिसांकडे तक्रार केली. सुरुवातीला हे प्रकरण नवी मुंबई पोलीस दलाच्या आर्थिक गुप्तवार्ता कक्षाकडे चौकशीसाठी पाठविण्यात आले. पोलीस उपायुक्त (गुन्हे) सचिन गुंजाळ यांच्या पथकाने या प्रकरणाची चौकशी केली.

सर्व जिल्ह्यांतील ओबीसी विद्यार्थी वसतिगृहांसाठी जागा निश्चिती तातडीने पूर्ण करा – मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

२० जिल्ह्यांत जागा निश्चित; उपलब्ध जागेनुसार चार आराखड्यांत उभारणार वसतिगृहे

मुंबई : राज्यातील २० जिल्ह्यांमध्ये इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे उभारण्याकरिता जागा निश्चित झाली असून, उर्वरित सर्व जिल्ह्यांतील जागा निश्चितीची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी. वसतिगृहांच्या इमारती, खोल्यांची रचना आणि सुविधांसाठी चार पर्यायी आराखडे तयार करून संबंधित जिल्ह्यातील जागेच्या उपलब्धतेनुसार बांधकाम करावे, असे निर्देश ओबीसी आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष तथा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

इतर मागास बहुजन कल्याण विभागाला वसतिगृहे आणि कार्यालयांच्या बांधकामासाठी एक रुपया नाममात्र दराने जागा उपलब्ध करून देण्यासाठी महसूल विभागाने केलेल्या कार्यवाहीचा उपसमितीने आढावा घेतला. महात्मा जोतिराव फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचाही बैठकीत आढावा घेण्यात आला. उपसमितीने 'महात्मा फुले यांच्या द्विजन्मशताब्दी' या विशेष बोधचिन्हाच्या संकल्पनेची निवड केली. महाज्योतीने दुष्काळ निवारणाशी संबंधित कार्यक्रम तयार करून समितीसमोर सादर करावा, तसेच महात्मा फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या साहित्याच्या प्रती छापून वितरणासाठी उपलब्ध कराव्यात, असे निर्देश उपसमितीने दिले. पुण्यातील भिडेवाडा राष्ट्रीय स्मारकाचे काम लवकर पूर्ण करण्याची सूचना उपसमितीने केली. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे जन्मस्थळ नायगाव, महात्मा फुले यांचे जन्मस्थळ कटगुण, (जि. सातारा) आणि सत्यशोधक समाजाशी संबंधित स्थळांच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक जतन-विकासाच्या कामांचाही उपसमितीने आढावा घेतला. पुणे येथील प्रस्तावित एकत्रित संकुलाच्या बांधकामासंदर्भात महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाच्या सादरीकरणाबाबतही उपसमितीने चर्चा केली.पुण्यातील फुलेवाडा आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मारक यांच्या सर्वांगीण विकासाला गती द्यावी. राज्य संरक्षित फुलेवाड्यापासून सुमारे १५० मीटर अंतरावरील पुणे महानगरपालिकेच्या मिळकतीतील सावित्रीबाई फुले स्मारकाला जोडणारा रस्ता विकसित करावा. तसेच फुलेवाड्याच्या परिसरातील आवश्यक जागांचे भूसंपादन करून स्मारक विस्ताराची कामे वेगाने पूर्ण करावीत, असे निर्देश मंत्री बावनकुळे यांनी दिले.



मंत्रालयात महसूल मंत्री श्री. बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली ओबीसी आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक झाली. यावेळी उपसमितीचे सदस्य तथा अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, वन मंत्री गणेश नाईक, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, माहिती व जनसंपर्क विभागाचे प्रधान सचिव ब्रिजेश सिंह, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सचिव आप्पासो धुळाज, विभागाच्या संचालिका सोनाली मुळे तसेच नियोजन, नगर विकास, उच्च व तंत्र शिक्षण आणि दुग्धविकास विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

भरती रखडली, पदोन्नतीला वेग; सिडकोच्या निर्णयावर उमेदवार नाराज

नवी मुंबई : सिडको महामंडळातील सहाय्यक विकास अधिकारी (सामान्य) पदांच्या भरती प्रक्रियेवरून सध्या नवा वाद निर्माण झाला आहे. ही भरती प्रक्रिया अंतिम टप्प्यात असताना सिडकोने पदोन्नतीचे नियम बदलून २४ रिक्त पदांपैकी १३ पदे सिडकोत काम करणाऱ्या क्षेत्र अधिकाऱ्यांना पदोन्नतीने बहाल केल्याच्या तक्रारी या प्रक्रियेत सहभागी झालेल्या उमेदवारांनी केल्या आहेत. भरती प्रक्रिया सुरु असताना अशाप्रकारे पदोन्नतीने पदे भरता येतात का असा सवाल यानिमीत्ताने केला जात आहे. दरम्यान सिडकोने मात्र या प्रक्रियेचे समर्थन केले आहे.

डिसेंबर २०२४ मध्ये सहाय्यक विकास अधिकारी (सामान्य) या संवर्गातील एकूण ४७ मंजूर पदांपैकी २३ पदांवर अधिकारी कार्यरत होते, तर २४ पदे रिक्त होती. सिडकोच्या तत्कालीन नियमानुसार क्षेत्र अधिकारी या पदावरील कर्मचारी सहाय्यक विकास अधिकारी पदोन्नतीसाठी पात्र नसल्याने ही सर्व २४ रिक्त पदे सरळसेवा भरतीसाठी जाहिरातीत समाविष्ट करण्यात आली होती. जुलै २०२५ मध्ये या पदांसाठी परीक्षा घेण्यात आली. त्यानंतर सप्टेंबर २०२५ मध्ये कागदपत्र पडताळणीसाठी ८० उमेदवारांना बोलावण्यात आले होते. ही प्रक्रिया सुरु असताना सिडकोतील अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्या. त्यानंतर नवीन अधिकाऱ्यांनी मंत्रालय स्तरावरून पदोन्नतीचे नियम बदलून सेवेत घेतल्याचा आरोप भरती प्रक्रियेत सहभागी झालेल्या काही उमेदवारांनी केला आहे. या कालावधीत सुमारे १३ ते १४ महिने इतर संवर्गाचे निकालही प्रलंबित ठेवण्यात आल्याचा दावा उमेदवारांनी केला आहे. सप्टेंबर महिन्यामध्ये एक आदेशामुळे सिडको मंडळाने १३ क्षेत्र अधिकाऱ्यांना सहाय्यक विकास



अधिकारी पदावर पदोन्नती देण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे सरळसेवा भरतीसाठी असलेल्या २४ पैकी १३ जागा पदोन्नतीने भरल्यामुळे त्याचा प्रभाव सरळ सेवा भरती प्रक्रियेतील पदांवर झाला आहे.

भरती प्रक्रियेला अर्थ काय?

ऑक्टोबर महिन्यात या संवर्गातील ४७ मंजूर पदांपैकी ज्येष्ठता यादीप्रमाणे १६ पदांवर अधिकारी कार्यरत आहेत. पदोन्नतीने १३ पदे भरली असून १८ पदे रिक्त आहेत. या १८ पदांपैकी सात पदांच्या आरक्षणाचा मुद्दा उपस्थित करून केवळ ११ पदे भरतीसाठी उपलब्ध करून देण्याची शक्यता असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. विशेषतः इतर मागासवर्गीय प्रवर्गातील पदांबाबत निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे या प्रवर्गासाठी एकही जागा शिल्लक राहणार नाही, अशी भीती उमेदवारांनी व्यक्त केली आहे. भरती प्रक्रियेतील विलंब आणि पदोन्नती प्रक्रियेतील वेग यांची तुलना करत उमेदवारांनी नाराजी व्यक्त केली असून ८० उमेदवारांच्या कागदपत्र पडताळणीला १३ महिन्यांहून अधिक काळ लोटूनही निकाल जाहीर झालेला नाही; मात्र पदोन्नतीचे नियम बदलल्यानंतर अल्पावधीत पदोन्नतीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आल्याचा आक्षेप यापैकी काही उमेदवारांनी घेतला आहे.

प्रारूप मतदार यादीत नाव नसल्यास नमुना क्र. ६ द्वारे पुन्हा नोंदणी करता येणार

मुंबई : विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) प्रक्रियेदरम्यान प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रारूप मतदार यादीत पूर्वी नाव असतानाही आता नाव समाविष्ट नसलेल्या नागरिकांना मतदार यादीत पुन्हा नाव नोंदविण्यासाठी नमुना क्र. ६ द्वारे नव्याने अर्ज करता येणार आहे. यापूर्वी मतदार यादीत नाव असतानाही नमुना क्र. ६ मध्ये अर्ज केल्यामुळे संबंधित मतदाराने खोटी घोषणा केली, असे मानले जाणार नाही.



तसेच, याप्रकरणी संबंधित मतदारावर कोणतीही कायदेशीर कारवाई केली जाणार नाही, असे भारत निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे.

नमुना क्र. ६ मध्ये पहिल्यांदाच मतदार यादीत नाव समाविष्ट होत असल्याबाबत घोषणा करावी लागते. त्यामुळे पूर्वी मतदार यादीत नाव असलेल्या; मात्र सध्याच्या प्रारूप यादीत नाव नसलेल्या काही मतदारांमध्ये नव्याने अर्ज करताना संभ्रम निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर भारत निवडणूक आयोगाने यासंदर्भात स्पष्टीकरण दिले आहे.

मुंबईतील १०, २०० अंगणवाडी सेविका व मदतनीसांना भाऊबीज भेट

मुंबई : अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना यंदाची भाऊबीज भेट दिवाळीपूर्वीच थेट बँक खात्यात अदा करण्यात आली आहे. मुंबईतील सुमारे १० हजार २०० अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची यंदाची दिवाळी आनंददायी होणार आहे, अशी माहिती बाल विकास प्रकल्प अधिकारी भाऊसाहेब तोरकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

अंगणवाडी सेविका व मदतनीस या महिला व बालविकास विभागाच्या विविध योजना आणि उपक्रमांची अंमलबजावणी तळागाळातील लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करीत असतात. गरोदर माता, स्तनदा माता, नवजात बालके तसेच सहा वर्षांखालील बालकांचे पोषण व आरोग्य संवर्धन, बालकांचे वजन व उंची मोजणे, कुपोषणाचे सर्वेक्षण, माता-बालकांना आरोग्यविषयक मार्गदर्शन, पूर्वप्राथमिक शिक्षण आणि बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविणे अशा अनेक जबाबदाऱ्या त्या पार पाडत असतात. याशिवाय शासनाच्या पोषण अभियानांतर्गत पोषण ट्रॅकर प्रणालीवर लाभार्थ्यांची नोंदणी, बालकांच्या वाढीचे निरीक्षण, पोषण आहार वितरणाची नोंद, विविध अहवाल सादर करणे तसेच आरोग्य व पोषणविषयक जनजागृती करण्याचे कामही अंगणवाडी सेविकांमार्फत केले जाते. या सर्व कामांमध्ये मदतनीस यांचेही योगदान अत्यंत महत्त्वाचे असते.

आयएसटीडी पश्चिम विभागीय परिषद २०२६ नवी मुंबईत उत्साहात संपन्न!

नवी मुंबई : इंडियन सोसायटी फॉर ट्रेनिंग अँड डेव्हलपमेंट, नवी मुंबई आणि स्कूल ऑफ लॉ, डॉ.डी.वाय.पाटील अभिमत विद्यापीठ, नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पश्चिम विभागीय परिषद २०२६ मोठ्या उत्साहात संपन्न झाली.

परिषदेत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. बी. व्ही. के. शर्मा यांनी उद्योगक्षेत्रातील बदलते प्रवाह, तंत्रज्ञानाचा वाढता प्रभाव आणि भविष्यातील संधी याविषयी मार्गदर्शन केले.

तसेच लार्सन अँड टुब्रोचे कार्यकारी उपाध्यक्ष (मानव संसाधन) तथा मुख्य मानव संसाधन अधिकारी डॉ. सी. जयकुमार यांनी बदलत्या औद्योगिक



आणि तंत्रज्ञानाधिष्ठित वातावरणात नवीन कौशल्ये आत्मसात करण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

केवळ शैक्षणिक पदवी किंवा अनुभव पुरेसा नसून सातत्यपूर्ण शिक्षण, कौशल्यवृद्धी, नवकल्पनांचा स्वीकार, नेतृत्वक्षमता आणि मानवी मूल्यांची जोपासना हीच भविष्यातील यशाची गुरुकिल्ली असल्याचा संदेश या परिषदेतून देण्यात आला.

या परिषदेला आयएसटीडीचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री.नागाभाना पानी, राष्ट्रीय उपाध्यक्ष प्रा. डॉ. के. ए. झकेरिया, राष्ट्रीय खजिनदार डॉ. आर. के. सुरी तसेच पश्चिम विभागीय उपाध्यक्ष डॉ. सुरेंद्र गेडाम यांची विशेष उपस्थिती लाभली. त्यांनी आयोजकांच्या प्रयत्नांचे कौतुक करत प्रशिक्षण, कौशल्य विकास आणि उद्योग-शिक्षण सहकार्याच्या दृष्टीने अशा परिषदांचे महत्त्व अधोरेखित केले.दोन दिवसीय परिषदेत तज्ज्ञांची व्याख्याने, संवादात्मक सत्रे आणि विविध विषयांवरील चर्चांच्या माध्यमातून ज्ञानाची देवाणघेवाण झाली. उद्योगक्षेत्राच्या बदलत्या गरजा आणि शैक्षणिक संस्थांमधील कौशल्य विकास यांची प्रभावी सांगड घालण्यावर विशेष भर देण्यात आला.या परिषदेमुळे उद्योगक्षेत्रातील व्यावसायिक, शिक्षणतज्ज्ञ आणि प्रशिक्षण क्षेत्रातील प्रतिनिधींना परस्पर संवाद, व्यावसायिक नेटवर्किंग आणि दीर्घकालीन अर्थपूर्ण सहकार्याच्या नव्या संधी उपलब्ध झाल्या.परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी परिषद संचालक श्री. विजय सिन्हा, परिषद संयोजक डॉ. वैशाली पाटील, परिषद सहसंयोजक डॉ. करुणा मालवीय, परिषद समन्वयक श्री. कुरियन डॅनियल आणि डॉ. दत्ताजीराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन समितीने विशेष परिश्रम घेतले.

परिषदेच्या यशाबद्दल आयएसटीडी नवी मुंबईचे अध्यक्ष डॉ. कुलदीप भालेराव यांनी सर्व मान्यवर, वक्ते, प्रतिनिधी, प्रायोजक, सहयोगी संस्था आणि आयोजन समितीच्या सदस्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

विशेषतः इमॅन्युएल जोसेफ(सचिव), डॉ.फिरदौस अन्सारी(खजिनदार), संदीप सिंग, के.सी. कौशिक, जॉन लिबेरा, डॉ. अनुरिता गौतम, महेश गंभीर, जयश्री काटकर, डॉ.उषा कुमार, प्रा.दिपाली खवले, आणि प्रा.प्राची दोडके यांच्या समर्पित योगदानाचे त्यांनी कौतुक केले.

"परिषदेचे यश हे केवळ दोन दिवसांच्या आयोजनापुरते मर्यादित नसून ज्ञान, कौशल्य, नेतृत्व आणि सहकार्याच्या माध्यमातून भविष्यातील सक्षम मनुष्यबळ घडविण्याच्या सामूहिक प्रयत्नांचे प्रतीक आहे.



स्फोटक फलंदाज ग्लेन मॅक्सवेलची आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती

सिडनी : ऑस्ट्रेलियाचा स्फोटक फलंदाज ग्लेन मॅक्सवेलने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. तब्बल १४ वर्षे ऑस्ट्रेलियाचे प्रतिनिधित्व केल्यानंतर त्याने आपल्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीला पूर्णविराम दिला. मॅक्सवेलने क्रिकेटच्या तिन्ही प्रकारांत ऑस्ट्रेलियासाठी खेळताना अनेक अविस्मरणीय खेळी केल्या. विशेषतः एकदिवसीय आणि टी-२० क्रिकेटमधील आक्रमक फलंदाजीमुळे त्याने जगभरात वेगळी ओळख निर्माण केली.



३८ वर्षीय मॅक्सवेलने ऑस्ट्रेलियाकडून सात कसोटी, १४९ एकदिवसीय आणि १२३ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले. कसोटी क्रिकेटमध्ये त्याने ३३९, एकदिवसीय क्रिकेटमध्ये ३ हजार ९९०, तर टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये २ हजार ८७७ धावा केल्या. याशिवाय आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १३६ बळीही घेतले. फलंदाजीसोबतच गोलंदाजीतही योगदान देणारा अष्टपैलू खेळाडू म्हणून त्याची ओळख होती.मॅक्सवेलने २५ ऑगस्ट २०१२ रोजी अफगाणिस्तानविरुद्ध शारजाह येथे एकदिवसीय क्रिकेटमधून आंतरराष्ट्रीय पदार्पण केले. त्यानंतर सप्टेंबर २०१२ मध्ये पाकिस्तानविरुद्ध टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले.

कामोठ्यात जाब विचारण्याच्या बहाण्याने तिघांकडून मारहाण आणि कारची तोडफोड

कामोठे : कारचा टायर फुटल्याने वाहन डिव्हायडरला धडकल्यानंतर जाब विचारण्याच्या बहाण्याने कारचालकाला बेदम मारहाण करून त्याच्या वाहनाची तोडफोड केल्याची घटना कामोठे परिसरात घडली. याप्रकरणी विक्रांत विलास देशमुख, ऋषी चव्हाण आणि अभिजय या तिघांविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात १ नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिनेश नारायण नेमणे (रा. माणगाव बुद्रुक) हे १ ऑक्टोबर रोजी कारने प्रवास करीत होते. कळंबोली रोडवरील बी. के. धाब्याजवळ कामोठे येथे त्यांच्या कारचा पुढील डाव्या बाजूचा टायर अचानक फुटला. त्यामुळे कारवरील नियंत्रण सुटून ती रस्त्याच्या डिव्हायडरला धडकली.

या घटनेनंतर विक्रांत देशमुख, ऋषी चव्हाण आणि अभिजय यांनी कारचालक दिनेश नेमणे यांना जाब विचारला. त्यानंतर तिघांनी त्यांच्यावर लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जखमी केले. एवढ्यावरच न थांबता त्यांनी कारची तोडफोड करून नुकसान केल्याची तक्रार दाखल करण्यात आली आहे.

या प्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस पुढील तपास करीत आहेत.

२० नोव्हेंबर रोजी राज्यस्तरीय ‘महाराष्ट्र बाल संसद २०२६’ चे आयोजन

मुंबई : बालकांचा निर्णयप्रक्रियेतील सहभाग वाढविणे, त्यांच्यात नेतृत्वगुण आणि लोकशाही मूल्यांची जोपासना करणे तसेच विकसित महाराष्ट्राच्या जडणघडणीत बालकांचे विचार, अपेक्षा आणि सूचना यांचा समावेश करणे या उद्देशाने महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या माध्यमातून प्रथमच अशा स्वरूपाच्या राज्यस्तरीय ‘महाराष्ट्र बाल संसद २०२६’ या उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग (एमएससीपीसीआर), यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) आणि युनिसेफ महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, २० नोव्हेंबर २०२६ रोजी जागतिक बाल दिनानिमित्त यशदा, पुणे येथे ही बाल संसद आयोजित करण्यात



येणार आहे. ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

या बाल संसदेमध्ये राज्यातील ३४ जिल्ह्यांतील १०२ नामनिर्देशित बालस्नेही ग्रामपंचायतींमधून निवडलेले १०० हून अधिक विद्यार्थी सहभागी होणार आहेत. इयत्ता सहावी ते दहावीमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना या उपक्रमात सहभागी होण्याची संधी मिळणार असून, प्रत्येक जिल्ह्यातून तीन विद्यार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण सहभागाला प्रोत्साहन देत सर्व स्तरांतील विद्यार्थ्यांना आपले विचार मांडण्यासाठी या व्यासपीठावर संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

‘विकसित महाराष्ट्र @२०४७’ ही या बाल संसदेची मध्यवर्ती संकल्पना आहे. भारताच्या स्वातंत्र्याच्या शताब्दी वर्षापर्यंत म्हणजेच २०४७ पर्यंत महाराष्ट्र कसा असावा, याबाबत विद्यार्थी आपले विचार, अपेक्षा, स्थानिक समस्या आणि त्यावरील उपाययोजना मांडणार आहेत.

बाल संसदेमध्ये विद्यार्थ्यांना लोकशाही प्रक्रियेचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा, या दृष्टीने कार्यक्रमाची रचना विधानसभेच्या कामकाजाच्या धर्तीवर करण्यात आली आहे. विद्यार्थी आपापल्या विभागीय समित्यांमध्ये चर्चा करून बालमंत्री निवडतील. त्यानंतर बाल मुख्यमंत्री आणि बाल सभापती यांची निवड करण्यात येईल. विद्यार्थी सदस्य म्हणून सभागृहात आपल्या जिल्ह्यांतील प्रश्न मांडतील, मंत्र्यांची निवेदने ऐकतील तसेच प्रश्नोत्तराच्या सत्रात संवाद साधतील.या उपक्रमात सहा विभागीय समित्यांमार्फत विविध विषयांवर चर्चा होणार आहे. पुणे विभागात शिक्षण, छत्रपती संभाजीनगर विभागात दुष्काळ, कोकण विभागात उद्योग व रोजगार, नाशिक विभागात बाल हक्क, नागपूर विभागात समाजमाध्यमे व डिजिटल पायाभूत सुविधा आणि अमरावती विभागात पोषण या विषयांवर विद्यार्थी आपले विचार आणि सूचना मांडतील.

दिवसभराच्या कार्यक्रमात शून्य प्रहराच्या माध्यमातून ३४ जिल्ह्यांतील विद्यार्थी आपल्या जिल्ह्यांमधील समस्या सभागृहासमोर मांडतील. त्यानंतर बालमंत्र्यांची विविध खात्यांशी संबंधित निवेदने, प्रश्नोत्तराचा तास आणि मान्यवर व वरिष्ठ शासकीय अधिकाऱ्यांशी संवाद अशी विविध सत्रे आयोजित करण्यात येणार आहेत.या बाल संसदेचा महत्वपूर्ण निष्पत्ती म्हणून बालकांनी मांडलेले मुद्दे, त्यांच्या समस्या, अपेक्षा आणि शिफारशी यांचा समावेश असलेली ‘बालकांची सनद’ तयार करण्यात येणार आहे. ही सनद मुख्यमंत्री तसेच संबंधित राज्य शासनाच्या विभागांना सादर करण्यात येणार आहे. सहभागी विद्यार्थी बाल संसदेतून मिळालेले अनुभव आणि शिकवण आपल्या ग्रामपंचायती व बालपंचायतींपर्यंत पोहोचवतील, अशी अपेक्षा आहे.

मतदार यादीतील दावे-हरकतींसाठी १३ नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ

रत्नागिरी : रत्नागिरी जिल्ह्यातील मतदार यादीसंदर्भात दावे आणि हरकती दाखल करण्यासाठी १३ नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे मतदारांना आपल्या नावाची नोंदणी, पत्ता तसेच इतर तपशिलांमधील त्रुटी दुरुस्त करून घेण्यासाठी आणखी काही दिवसांची संधी उपलब्ध झाली आहे.मतदार यादीमध्ये अनेकदा नावाचा चुकीचा उल्लेख, पत्त्यातील त्रुटी, नाव वगळले जाणे किंवा इतर माहितीमध्ये चुका आढळतात. अशा त्रुटींमुळे निवडणुकीच्या वेळी मतदानाचा हक्क बजावताना नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागू शकतो. ही बाब लक्षात घेऊन मतदार यादीतील दावे आणि हरकती दाखल करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे.ज्या नागरिकांचे नाव मतदार यादीत समाविष्ट झालेले नाही, तसेच ज्यांच्या नावात, पत्त्यात किंवा अन्य तपशिलांमध्ये चुका आहेत, त्यांना निर्धारित प्रक्रियेनुसार आवश्यक अर्ज आणि कागदपत्रे सादर करता येणार आहेत. मतदारांनी आपली माहिती तपासून आवश्यक त्या दुरुस्त्यांसाठी वेळेत अर्ज करणे गरजेचे आहे.विशेषतः नव्याने मतदार नोंदणी करू इच्छिणारे पात्र नागरिक, स्थलांतरामुळे पत्ता बदललेले मतदार आणि यादीतील त्रुटी दुरुस्त करू इच्छिणाऱ्यांसाठी ही मुदतवाढ महत्त्वाची ठरणार आहे.

चिपळूणमध्ये बनावट फूड इन्स्पेक्टरचा सुळसुळाट; हॉटेल चालकाकडे ५ हजारांची खंडणी मागितली

चिपळूण : अन्न सुरक्षा विभागाचा अधिकारी असल्याचे भासवून हॉटेल व्यावसायिकांना कारवाईची धमकी देत पैसे उकळण्याचा प्रकार चिपळूण शहरात उघडकीस आला आहे. महालक्ष्मी चायनीज सेंटरचे चालक रणवीर सावंत यांच्याकडे एका तोतया अधिकाऱ्याने पाच हजार रुपयांची खंडणी मागितल्याचा प्रकार समोर आला आहे. या घटनेमुळे शहरातील हॉटेल व्यावसायिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, एका व्यक्तीने रणवीर सावंत यांना



फोन करून आपली ओळख अन्न सुरक्षा विभागाचा अधिकारी संदीप शिंदे अशी करून दिली. हॉटेलचे परवाने आणि कर्मचाऱ्यांचे वैद्यकीय तपासणी अहवाल वेळेत सादर केले नसल्याचा आरोप त्याने केला. तसेच या कारणावरून हॉटेलवर कारवाई करण्याची धमकी दिली.

संबंधित व्यक्तीने हॉटेल २४ दिवसांसाठी सील करण्यात येईल, तसेच ६५ हजार ८०० रुपयांचा दंड आकारण्यात येईल, असे सांगून सावंत यांच्यावर दबाव आणला. ही कारवाई टाळायची असेल तर पाच हजार रुपये द्यावे लागतील, अशी मागणीही त्याने केली. पैसे पाठविण्यासाठी संबंधित व्यक्तीने व्हॉट्सॲपवर स्कॅनर पाठवला.

मात्र, रणवीर सावंत यांनी प्रसंगावधान राखत अन्न सुरक्षा विभागाच्या अधिकृत कार्यालयाशी संपर्क साधून या प्रकाराची खातरजमा केली. चौकशीदरम्यान संदीप शिंदे या नावाचा कोणताही अधिकारी विभागात कार्यरत नसल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे आपण फसवणुकीच्या जाळ्यात अडकणार असल्याचे त्यांच्या लक्षात आले.

या प्रकारामुळे चिपळूणमधील हॉटेल व्यावसायिकांनी सतर्क राहण्याची गरज निर्माण झाली आहे. कोणतीही व्यक्ती अधिकारी असल्याचे सांगून पैसे मागत असल्यास तिची अधिकृत ओळख तपासावी आणि पैशांची मागणी झाल्यास संबंधित विभागाकडे तक्रार करावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

ग्रॅव्हिटी पाणी योजनेसाठी चिपळूण पालिका मोडणार मुदतठेवी; ५.१६ कोटींचा निधी उभारणार



चिपळूण : चिपळूण शहरातील पाणीपुरवठ्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्याच्या दृष्टीने महत्त्वाकांक्षी ग्रॅव्हिटी पाणीपुरवठा योजनेला गती देण्यासाठी नगरपालिकेने मोठा आर्थिक निर्णय घेतला आहे. कोयना जलविद्युत प्रकल्पाकडे जमा करावयाच्या ५ कोटी १६ लाख रुपयांच्या निधीची तरतूद करण्यासाठी पालिकेच्या मुदतठेवी मोडण्याचा ठराव विशेष सभेत एकमताने मंजूर करण्यात आला.

ग्रॅव्हिटी पाणीपुरवठा योजनेतील टॅपिंग आणि जलवाहिनीच्या कामांसाठी अतिरिक्त निधीची आवश्यकता निर्माण झाली आहे. त्यानुसार एकूण ५ कोटी १६ लाख रुपये कोयना जलविद्युत प्रकल्पाकडे जमा करावे लागणार आहेत. यापैकी पहिल्या टप्प्यात २ कोटी ५८ लाख रुपये भरावे लागतील, तर उर्वरित रक्कम कामाचे आदेश दिल्यानंतर जमा करावी लागणार आहे. या आर्थिक तरतुदीसाठी पालिकेच्या मुदतठेवी मोडण्याचा पर्याय स्वीकारण्यात आला आहे.विशेष सभेत पालिकेच्या आर्थिक परिस्थितीवरही सविस्तर चर्चा झाली. शहराच्या पाणीपुरवठा व्यवस्थेवर दरवर्षी सुमारे सहा कोटी रुपये खर्च होत असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले. मात्र, नागरिकांकडून मिळणाऱ्या पाणीपट्टीच्या माध्यमातून केवळ दीड कोटी रुपयांची वसुली होत असल्याने पालिकेवर आर्थिक ताण निर्माण होत आहे.

अशा परिस्थितीत मुदतठेवी मोडून निधी उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ग्रॅव्हिटी योजनेमुळे भविष्यात पाणीपुरवठ्याचा प्रश्न सुटण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. शहराला नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने पालिकेचा हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

पनवेल महापालिकेच्या विस्ताराचा मार्ग मोकळा; १९ गावांच्या समावेशाला मंजुरी

पनवेल: पनवेल महापालिकेच्या हद्दीत गव्हाण आणि वडघर जिल्हा परिषद गटांमधील १९ गावांचा समावेश करण्याच्या प्रस्तावाला विशेष सर्वसाधारण सभेत मंजुरी देण्यात आली. या विस्तारामुळे महापालिकेच्या क्षेत्रात सुमारे ७०.३१ चौरस किलोमीटरची भर पडणार असून, एकूण क्षेत्रफळ १८०.३७ चौरस किलोमीटर होणार आहे. मात्र, या प्रस्तावावर चर्चा सुरू असताना विरोधी बाकांवरील सदस्यांनी सभात्याग केला. या विस्ताराला शासनाची परवानगी मिळाल्यानंतर महापालिकेच्या महसूलात तब्बल दिडशे कोटी रूपयांची वाढ होऊ शकेल असा दावा करण्यात आला आहे.



गव्हाण आणि वडघर परिसरातील १९ गावांचा महापालिकेत समावेश करण्याची मागणी तेथील ग्रामस्थांकडून करण्यात येत असल्याकडे महापौर नितिन पाटील यांनी प्रस्तावावर निवेदन सुरू असताना माहिती दिली. महापालिका प्रशासनाने ४ एप्रिल २०२५ रोजी शासनाला प्रस्ताव सादर केला होता. राज्याच्या नगरविकास विभागाने १४ ऑक्टोबरला महापालिकेला पत्र पाठवून या समावेशाबाबत सर्वसाधारण सभेचा ठराव आणि प्राथमिक अधिसूचनेचा मसुदा सादर करण्याचे निर्देश दिले होते. या प्रस्तावाला विरोधी पक्षांनी विरोध केला. सभात्याग करण्यापूर्वी ग्रामीण तसेच शहरी भागात पनवेल महापालिका पुरेशा सुविधा देऊ शकत नाही, असेही सांगितले. त्यावर स्पष्टीकरण देताना सभागृह नेते बिनेदार यांनी महापालिकेकडून ग्रामीण भागात सुरू असलेल्या विकासकामांची माहिती दिली. महापालिकेने ३३ जलकुंभ उभारण्याचे नियोजन केले असून, त्यापैकी १८ पूर्ण झाले आहेत, तर सात जलकुंभांची कामे सुरू आहेत. पिसार्वे तलावाचा विकास तसेच सिद्धी करवले आणि आडिवली तलावांची कामे पूर्ण झाली आहेत. पथदिवे आणि रस्त्यांचे काँक्रीटीकरण यांसह अन्य विकासकामेही सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. पूर्वीच्या ग्रामपंचायतींना अशा स्वरूपाची कामे करणे शक्य होत नव्हते, असेही त्यांनी नमूद केले.

रोजगाराच्या संधींचा स्थानिक तरुणांना लाभ

आयुक्त मंगेश चितळे यांनी या विस्तारामुळे महापालिकेच्या मालमत्ता कराच्या महसुलात सुमारे १५० कोटी रुपयांची वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली. प्रस्तावित क्षेत्रात ऐरोसिटी, एज्युसीटी, स्पोर्टसीटी आणि मेडिसिटीसारखे प्रकल्प विकसित होत आहेत.

या परिसराचे नियोजन प्राधिकरण सिडकोकडेच राहणार असल्याने सुनियोजित विकासाला मदत होईल. तसेच या प्रकल्पांमधून निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या संधींचा स्थानिक तरुणांना लाभ मिळू शकेल, असे त्यांनी सभागृहाला अवगत केले.

सध्या पनवेल महापालिकेचे क्षेत्र ११०.०६ चौरस किलोमीटर असून, २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ५ लाख ९ हजार ९०१ आहे. प्रस्तावित १९ गावांची लोकसंख्या ५३ हजार २०३ असल्याने समावेशानंतर महापालिकेची लोकसंख्या ५ लाख ६२ हजार १०४ होईल.

सिडको नियोजन प्राधिकरण असलेल्या क्षेत्रातून मिळणाऱ्या अधिमूल्याच्या २५ टक्के रकमेचा लाभही महापालिकेला मिळू शकणार आहे.

एपीएमसी दाणा मार्केटमध्ये भीषण दुर्घटना

गोण्यांखाली दबून कामगाराचा मृत्यू

नवी मुंबई : वाशी येथील मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या (एपीएमसी) दाणा मार्केटमध्ये तांदळाच्या गोण्यांची उंच रचलेली थप्पी अंगावर कोसळल्याने एका ३७ वर्षीय हमालाचा मृत्यू झाला. मंगळवारी (३ नोव्हेंबर) सायंकाळी दुकानात काम करत असताना ही दुर्घटना घडली. रामराज लौटु असे मृत कामगाराचे नाव असून, या घटनेमुळे दाणा मार्केटमधील कामगारांच्या सुरक्षितेतेचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे.

रामराज लौटु हे तुर्भे स्टोअर्स परिसरात वास्तव्यास होते. मूळचे उत्तर प्रदेशातील गोरखपूर जिल्ह्यातील आनंदगढ येथील असलेले रामराज एपीएमसी दाणा मार्केटमधील 'श्रीराम कल्याणजी अॅग्रो' (एम/३) या दुकानात हमालीचे काम करत होते. मंगळवारी सायंकाळी दुकानात काम सुरू असताना तांदळाच्या गोण्यांची रचलेली उंच थप्पी अचानक त्यांच्या अंगावर कोसळली. त्यामुळे जड गोण्यांखाली ते दबले गेले. या घटनेने दुकानातील कामगारांची धावपळ उडाली. इतर कामगारांनी तातडीने गोण्या बाजूला करून रामराज यांना बाहेर काढले. मात्र, त्यांना गंभीर दुखापत झाली होती आणि ते बेशुद्ध अवस्थेत होते.

सहकाऱ्यांनी त्यांना तातडीने वाशी येथील पी. के. सी. रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर सायंकाळी ५ वाजून ३६ मिनिटांनी त्यांना मृत घोषित केले. कामाच्या ठिकाणी घडलेल्या या दुर्घटनेत एका कामगाराचा जीव गेल्याने बाजार आवारातील मालाच्या साठवणुकीची पद्धत आणि सुरक्षेच्या उपाययोजनांचा मुद्दा उपस्थित झाला आहे.

दरम्यान, या घटनेची माहिती मृत कामगाराचे भाऊ राजकुमार लौटु यांनी एपीएमसी पोलीस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक आबासाहेब पाटील, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक महेश मांडवे आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील मोहिते यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. फॉरेन्सिक पथकानेही घटनास्थळाची पाहणी करून पंचनामा केला. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील मोहिते करीत आहेत.

अतिरिक्त १५ टक्के पाणीकपातीला तूर्तास ब्रेक; आधी पाणीपुरवठा सुरळीत करण्याच्या सूचना

पनवेल : पनवेलकरांना सध्या पुरेसा आणि नियमित पाणीपुरवठा होत नसताना त्यात आणखी कपात करण्याऐवजी आधी उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करून नागरिकांना पुरेसे पाणी द्या, अशा शब्दांत आमदार प्रशांत ठाकूर आणि महापौर नितीन पाटील यांनी महापालिका प्रशासनाला सुनावले. पाणीपुरवठ्यात आणखी १५ टक्के कपात करण्याचा निर्णय घेण्यापूर्वी पर्यायी जलस्रोतांचा वापर आणि सुरू असलेल्या जलप्रकल्पांची कामे यांना प्राधान्य देण्याच्या सूचना सोमवारी झालेल्या आढावा बैठकीत देण्यात आल्या.

पनवेल महापालिकेच्या मुख्यालयात आयोजित या बैठकीत न्हावाशेवा टप्पा तीन जलप्रकल्पाच्या कामाचा आढावा घेण्यात आला. तसेच महापालिका क्षेत्रातील लहान धरणे, तलाव, विहिरी आणि बोअरवेल यांमधील उपलब्ध पाण्याचा पिण्यासाठी वापर करता येईल का, याची चाचपणी करण्याचे निर्देश देण्यात आले. या जलस्रोतांचा वापर करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांचा अभ्यास करून तातडीने अहवाल सादर करण्यास प्रशासनाला सांगण्यात आले.बैठकीला आमदार प्रशांत ठाकूर, महापौर नितीन पाटील, आयुक्त मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, विविध विभागांचे अधिकारी आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अधिकारी उपस्थित होते.पनवेल महापालिकेने यापूर्वीच अंशतः पाणीकपात लागू केली आहे. त्यामुळे अनेक गृहनिर्माण सोसायट्या आणि इमारतींमधील रहिवाशांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत असून, नगरसेवकांकडे तक्रारी येत आहेत. त्यात आणखी १५ टक्के कपात केल्यास आठवड्यातून दोन दिवस पाणीपुरवठा बंद ठेवण्याची वेळ येऊ शकते अशी भीती नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

एमजीएम स्किल्स लॅबला राष्ट्रीय पुरस्कार

पनवेल : कामोठे येथील महात्मा गांधी मीशन (एमजीएम) वैद्यकीय महाविद्यालय आणि रूग्णालयाच्या स्किल्स लॅबला वैद्यकीय प्रशिक्षण आणि कौशल्य विकास क्षेत्रातील योगदानासाठी 'एफआयसीसीआय हेल्थकेअर एक्सलन्स पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला. नवी दिल्ली येथे २७ ऑक्टोबर रोजी झालेल्या सोहळ्यात 'सर्वोत्कृष्ट प्रशिक्षण आणि कौशल्य विकास उपक्रम' या विभागात हा पुरस्कार देण्यात आला. स्किल्स लॅबचे संचालक डॉ. विश्वास साठे यांनी संस्थेच्या वतीने हा पुरस्कार स्वीकारला.

एफआयसीसीआय हेल्थकेअर पुरस्कारांचे हे १८ वे वर्ष होते. दिवंगत डॉ. समीर कदम यांनी स्थापन केलेल्या एमजीएम स्किल्स लॅबने वैद्यकीय शिक्षण, प्रत्यक्ष प्रशिक्षण आणि कॅडव्हर प्रशिक्षण क्षेत्रात स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. या केंद्राला अमेरिकन हार्ट असोसिएशन (एएचए), अमेरिकन कॉलेज ऑफ सर्जन्स (एसीएस) आणि रॉयल कॉलेज ऑफ सर्जन्स, यूके यांसारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांची मान्यता मिळाली आहे. तसेच एमआरसीपीसीएच आणि एमआरसीएस या आंतरराष्ट्रीय परीक्षांसाठी अधिकृत केंद्र म्हणूनही ते कार्यरत आहे.



एमजीएम मेडिकल कॉलेज अँड हॉस्पिटल हे एएचएकडून 'कॉम्प्रिहेन्सिव्ह चेस्ट पेन सेंटर' आणि 'कॉम्प्रिहेन्सिव्ह स्ट्रोक सेंटर' म्हणून प्रमाणित होणाऱ्या देशातील पहिल्या वैद्यकीय महाविद्यालयांपैकी एक आहे. हा पुरस्कार संस्थेतील प्राध्यापक, विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांच्या सामूहिक योगदानाचा सन्मान असल्याचे आणि हा पुरस्कार दिवंगत डॉ. समीर कदम यांना समर्पित करण्यात आल्याचे यावेळी एमजीएम स्किल्स लॅबचे संचालक डॉ. विश्वास साठे यांनी घोषित केले.

खासगीकरणाविरोधात आयडीबीआय बँक कर्मचाऱ्यांचे आंदोलन

नवी मुंबई : आयडीबीआय बँकेच्या प्रस्तावित खासगीकरणाला विरोध करण्यासाठी बँकेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सोमवारी सकाळी बेलापूर येथील अर्बन हार्ट परिसरात निषेध आंदोलन केले. केंद्र सरकार आणि भारतीय आयुर्विमा महामंडळाकडून (एलआयसी) आयडीबीआय बँकेची विक्री करण्याच्या निर्णयाला विरोध दर्शवत कर्मचाऱ्यांनी दोन दिवसीय देशव्यापी आंदोलनात सहभाग घेतला. या आंदोलनात नवी मुंबई आणि परिसरातील सुमारे १५० ते २०० अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते.



युनायटेड फोरम ऑफ आयडीबीआय ऑफिसर्स अँड एम्प्लॉईज या संघटनेने २ आणि ३ नोव्हेंबर रोजी देशभरातील बँकेच्या शाखा व कार्यालयांमध्ये दोन दिवसीय उपोषण आंदोलनाची हाक दिली आहे. त्याचाच भाग म्हणून बेलापूर येथे हे आंदोलन करण्यात आले. बँकेचे खासगीकरण थांबवावे, केंद्र सरकारने बँकेतील किमान ५१ टक्के भागभांडवल कायम ठेवण्यासाठी आणखी सहा टक्के भागभांडवल खरेदी करावे, तसेच कर्मचाऱ्यांच्या विद्यमान सेवा अटी, निवृत्तिवेतन, कल्याणकारी योजना आणि आरक्षण धोरणाचे संरक्षण करावे, अशा प्रमुख मागण्या संघटनेने केल्या आहेत.

बँकेचे खासगीकरण झाल्यास सार्वजनिक क्षेत्रातील बँक म्हणून तिचे स्वरूप संपुष्टात येईल. त्याचा परिणाम ठेवीदार, शेतकरी, लघुउद्योजक, विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांवर होऊ शकतो, अशी भूमिका संघटनेने मांडली आहे. बँकेतील कर्मचाऱ्यांच्या रोजगाराच्या सार्वजनिक क्षेत्रातील स्वरूपाचे संरक्षण करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

नवी मुंबईत क्लस्टरच्या मंजुरीवर महापालिकेचा आक्षेप

युआरएसच्या मंजुरीविरोधात न्यायालयात जाणार

नवी मुंबई : शहराच्या पायाभूत सुविधांची क्षमता तपासल्याशिवाय क्लस्टर पुनर्विकासाचे प्रस्ताव पुढे नेण्याच्या राज्य शासनाच्या भूमिकेला नवी मुंबई महापालिकेने आव्हान देण्याचा निर्णय घेतला आहे. शहराची वहन क्षमता आणि पायाभूत सुविधांवरील संभाव्य परिणामांचा अभ्यास पूर्ण होईपर्यंत युआरएस (शहरी पुनर्नवीकरण योजना) अर्थात क्लस्टर पुनर्विकासाच्या प्रस्तावांना मंजुरी देऊ नये, अशी भूमिका घेत शासनाच्या १५ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या निर्देशांविरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात येणार आहे. यासंबंधीचा ठराव सोमवारी (२ नोव्हेंबर) झालेल्या महासभेत ६० विरुद्ध ३१ मतांनी मंजूर झाला. दरम्यान, घणसोलीतील सिम्प्लेक्स क्लस्टर योजनेवरून शिवसेनेच्या शिंदे गटातील अंतर्गत मतभेदही याच चर्चेत उघड झाले. महापौर सुजाता पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या महासभेत युआरएस आणि शासनाच्या पत्रावर चर्चा झाली. यापूर्वी महासभेने क्लस्टर पुनर्विकासाच्या प्रस्तावांना स्थगिती देण्याची भूमिका घेतली होती. मात्र, नगरविकास विभागाने १५ ऑक्टोबर रोजी पाठवलेल्या पत्राद्वारे यापूर्वी अधिसूचित झालेले आणि उच्चाधिकार समितीसमोर प्रलंबित असलेले प्रस्ताव पुढील मंजुरीसाठी मार्गी लावण्याचे निर्देश दिले. शहराच्या पायाभूत सुविधांवरील परिणाम आणि वहन क्षमतेचा अभ्यास आवश्यक असल्याचे शासनाने मान्य केले असतानाच प्रलंबित प्रस्ताव पुढे नेण्याचे निर्देश दिल्याने महापालिकेने या भूमिकेवर आक्षेप घेतला आहे. सभागृह नेते सागर नाईक यांनी शासनाला पाठविण्यात येणाऱ्या आक्षेपांच्या प्रारूपाचे सभागृहात वाचन केले. केवळ अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांक (एफएसआय) मिळतो किंवा पुनर्विकासातून आर्थिक फायदा होतो म्हणून शहरात विशेष पुनर्विकास योजना राबवणे योग्य नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पनवेलकरांच्या मॉर्निंग वॉकला ब्रेक; पादचारी, सायकलस्वारांना बंदी!

पनवेल : शारीरिक कसरतीचा मुख्य भाग असलेल्या मॉर्निंग वॉकवर आता वाहतुकीच्या निर्बंधांमुळे मर्यादा येणार आहेत. कर्नाळा स्पोर्ट्ससमोरून नवी मुंबई विमानतळाच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावर पायी चालण्यास तसेच सायकल चालविण्यास मज्जाव करण्यात आला आहे. अपघातांचा धोका लक्षात घेऊन नवी मुंबई पोलीस वाहतूक विभागाने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, ५ नोव्हेंबरपासून या निर्बंधांची अधिसूचना लागू होणार आहे.

पनवेल शहरासह आजूबाजूच्या ग्रामीण भागातील नागरिक पहाटेपासून सकाळी ९ वाजेपर्यंत चालण्याचा व्यायाम आणि इतर शारीरिक कसरती करण्यासाठी मोठ्या संख्येने कर्नाळा स्पोर्ट्ससमोरील मार्गावर येत असतात. मात्र, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे जाणाऱ्या वाहनांची संख्या आणि वाढती वाहतूक पाहता या मार्गावर पादचारी आणि सायकलस्वारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.विमानतळाकडे जाणाऱ्या वाहनांची संख्या वाढत असल्याने कळंबोली वाहतूक पोलिसांनी पोलीस उपायुक्त राहुल खाडे यांच्याकडे केलेल्या शिफारशीमुळे हा निर्णय घेण्यात आला आहे. अपघातप्रवण क्षेत्र किंवा अपघाताची शक्यता लक्षात घेऊन पादचारी आणि सायकलस्वारांना निर्बंधित क्षेत्रातून जाण्यास मज्जाव करण्यात आला आहे.

त्यामुळे नागरिकांच्या जिव्हाळ्याचा आणि आरोग्याशी संबंधित असलेल्या मॉर्निंग वॉकच्या संकल्पनेपूर्वीच काटछाट करण्यात आल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. वाहतूक खात्याने नागरिकांच्या सूचना न मागविता हा कठोर निर्णय घेतल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

पनवेल महापालिका आणि वाहतूक खात्यातील लोकप्रतिनिधींनी याबाबत कोणतीही ठोस भूमिका घेतली आहे का, याबाबतही नागरिकांमध्ये प्रश्न उपस्थित होत आहेत. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या मॉर्निंग वॉकसाठी पर्यायी व्यवस्था करण्याची मागणी होत आहे.

तळोजातील रायगड इस्टेटच्या रहिवाशांचा सिडको भवनावर मोर्चा

पनवेल : तळोजा फेज-२ मधील सेक्टर २८ येथील रायगड इस्टेट फेज-१ या सिडकोनिर्मित २५ मजली इमारतीमधील गृहसंकुलातील रहिवाशांना दिवसातून अवघ्या २० मिनिटांसाठी पाणी मिळत असल्याने अखेर आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागला. अपुरा आणि अनियमित पाणीपुरवठा, कमी दाबाने येणारे पाणी आणि जलमापक यंत्रातील संभाव्य तांत्रिक बिघाड यांमुळे रहिवासी त्रस्त झाले आहेत. या समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी शुक्रवारी (ता. ३०) रहिवाशांनी बेलापूर येथील सिडको भवनावर मोर्चा काढला. त्यानंतर झालेल्या बैठकीत सिडकोच्या अधिकाऱ्यांनी पाणीपुरवठा सुरळीत करण्यासह विविध तांत्रिक उपाययोजनांचे लेखी आश्वासन दिले.



सिडको मंडळाकडे पुरेसा पाणीसाठा उपलब्ध नसल्याने सोमवारपासून पाणीपुरवठ्याचे नियोजन बदलण्यात आले आहे. काही नोडमध्ये एक दिवसाआड पाणीपुरवठा, तर आठवड्यातील एक दिवस पूर्णपणे पाणीपुरवठा बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र, या नियोजनापूर्वीच रायगड इस्टेट या इमारतीमधील रहिवासी मागील अनेक दिवसांपासून पाणी समस्येने बेजार झाले आहेत. दिवसातून केवळ २० मिनिटे सदनिकेच्या नळातून पाणी मिळत असल्याने जगावे कसा असा प्रश्न या रहिवाशांना पडला आहे. त्यामुळे घरगुती वापरासाठी पाणी साठवताना रहिवाशांची मोठी गैरसोय होत आहे.

३० ऑक्टोबर रोजी काढलेल्या मोर्चात विजय थोरात, चंद्रशेखर साळवी, रोहन राऊत, अजय पवळ, दत्तात्रय गोळे, कुंडलिक कदम, नितीन खरात, सुनील धुरी यांच्यासह दोनशेहून अधिक रहिवासी या आंदोलनात सहभागी झाले होते. रायगड इस्टेट इमारतीपासून ते पेणधर मेट्रो स्थानकापर्यंत या रहिवाशांनी 'पाणी आमच्या हक्काच, कोण म्हणत देणार नाही' अशा घोषणा देत पायी सिडकोविरोधात मोर्चा काढला. त्यानंतर हे आंदोलक बेलापूर येथील सिडको भवन येथे पोहचले. पोलिसांनी कायदा सुव्यवस्थेचे कारण देत आंदोलकांना अर्बनहार्टमध्ये उभे राहण्याची सवलत दिली. त्यानंतर रहिवाशांच्या १० प्रतिनिधींच्या शिष्टमंडळाने सिडको अधिकाऱ्यांची भेट घेऊन समस्यांची माहिती दिली.

या बैठकीत जलमापक यंत्रातील हवेच्या दाबामुळे होणाऱ्या संभाव्य बिघाडाची तांत्रिक तपासणी करून दुरुस्ती करण्याचे आश्वासन देण्यात आले.

रेल्वेची घरपोच पार्सल सेवा; आठ शहरांत लवकरच सुविधा

नवी दिल्ली :

भारतीय रेल्वेने पार्सल वाहतुकीत मोठा बदल करत 'घर से घर तक' या नव्या डोअर-टू-डोअर पार्सल सेवेची घोषणा केली आहे. या सेवेमुळे ग्राहकांना आता पार्सल बुक करण्यासाठी किंवा पाठवण्यासाठी रेल्वे स्थानकावर जाण्याची गरज भासणार नाही. रेल्वेच्या अधिकृत मोबाईल ॲपद्वारे ऑनलाइन बुकिंग आणि पेमेंट करून ग्राहक आपल्या घरातूनच पार्सल उचलण्याची सुविधा मिळवू शकतील. प्रायोगिक प्रकल्प यशस्वी झाल्यानंतर ही सेवा दिल्ली, मुंबई, पुणे, अहमदाबाद, चेन्नई, कोलकाता, हैदराबाद आणि बंगळूर या आठ प्रमुख शहरांमध्ये सुरू करण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे पार्सल वाहतुकीचा खर्च खासगी कुरिअर कंपन्यांच्या तुलनेत कमी होण्याची अपेक्षा असून, लघुउद्योजक, ऑनलाइन विक्रेते आणि सामान्य ग्राहकांना याचा मोठा लाभ मिळणार आहे. 'घर से घर तक' या विशेष ॲपद्वारे ग्राहक थेट सेवा प्रदात्यांशी जोडले जाणार असून, संपूर्ण प्रक्रिया डिजिटल पद्धतीने पूर्ण करता येणार आहे. या सेवेअंतर्गत लॉजिस्टिक्स कंपनी ग्राहकाच्या घरातून पार्सल उचलून संबंधित रेल्वे स्थानकावर आणेल. त्यानंतर रेल्वेमार्फत ते पार्सल गंतव्य स्थानकापर्यंत पोहोचवले जाईल आणि तेथून दुसरी लॉजिस्टिक्स कंपनी संबंधित पत्त्यावर पार्सलची सुरक्षित डिलिव्हरी करेल. उदाहरणार्थ, मुंबईहून पुण्याला पार्सल पाठवायचे असल्यास कंपनी प्रथम ग्राहकाच्या घरातून पार्सल घेऊन मुंबई रेल्वे स्थानकावर आणेल, त्यानंतर रेल्वेने ते पुण्यात पोहोचवले जाईल आणि शेवटी निश्चित पत्त्यावर वितरित केले जाईल.

रेशनच्या रांगा संपणार; राज्यभरात सुरू होणार 'अन्नपूर्ती ग्रेन एटीएम'

मुंबई :

शासकीय रेशन दुकानांमधील काळाबाजार, वजनातील तफावत आणि वितरणातील गैरव्यवहार रोखण्यासाठी राज्य सरकारने 'अन्नपूर्ती ग्रेन एटीएम'च्या माध्यमातून धान्य वितरणाची नवी प्रणाली सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या उपक्रमाचा पायलट प्रकल्प नाशिक जिल्ह्यात यशस्वी ठरल्यानंतर आता मुंबई, ठाणे, नागपूरसह राज्यातील इतर भागांमध्येही ही आधुनिक व्यवस्था टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात येणार आहे. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते नुकतेच नाशिक येथे या ग्रेन एटीएमचे उद्घाटन करण्यात आले. संयुक्त राष्ट्रांच्या जागतिक अन्न कार्यक्रमाच्या (WFP) सहकार्याने विकसित करण्यात आलेली ही यंत्रणा २४ तास कार्यरत राहणार असून, पात्र शिधापत्रिकाधारकांना निश्चित प्रमाणात धान्य स्वयंचलित पद्धतीने उपलब्ध करून देणार आहे. सुमारे ५० लाख रुपये किमतीचे



हे यंत्र महाराष्ट्राला विनामूल्य उपलब्ध झाले असून, त्यामध्ये एकावेळी सुमारे २, ५०० किलो म्हणजेच २५ क्विंटल धान्य साठवण्याची क्षमता आहे. महाराष्ट्रात सध्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत सुमारे ५४ हजार रास्त भाव दुकाने कार्यरत असून, त्यामार्फत जवळपास ७.५ कोटी लाभार्थ्यांना धान्याचा पुरवठा केला जातो. नवीन प्रणालीमुळे रेशन दुकानांवरील लांबच लांब रांगा कमी होण्याबरोबरच धान्य वितरण अधिक पारदर्शक आणि अचूक होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. 'अन्नपूर्ती ग्रेन एटीएम'मधून धान्य घेण्यासाठी लाभार्थ्यांना प्रथम शिधापत्रिका किंवा आधार क्रमांकाच्या आधारे नोंदणी करावी लागेल. त्यानंतर बायोमेट्रिक पडताळणी पूर्ण झाल्यावर शासनाच्या नोंदीतील पात्रतेनुसार मशीन अवघ्या ३५ सेकंदांत आवश्यक प्रमाणात धान्य वितरित करेल. संपूर्ण प्रक्रिया स्वयंचलित असल्यामुळे वजनातील त्रुटी, अपुरा धान्यपुरवठा आणि काळाबाजार यावर प्रभावी नियंत्रण ठेवणे शक्य होणार आहे. या यंत्रणेची मूळ क्षमता एका वेळी ५० किलोपर्यंत धान्य सुमारे पाच मिनिटांत वितरित करण्याची असली, तरी प्रत्यक्ष वितरणाची क्षमता स्थानिक व्यवस्थेनुसार निश्चित केली जाणार आहे. तंत्रज्ञानाच्या मदतीने सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक कार्यक्षम, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख करण्याच्या दिशेने हा महत्त्वाचा टप्पा मानला जात असून, आगामी काळात राज्यभर या आधुनिक यंत्रणेचा विस्तार केल्यानंतर लाखो लाभार्थ्यांना जलद, अचूक आणि विश्वासार्ह सेवा उपलब्ध होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

शास्त्रीपूल-डिंगणी रस्त्याची दुरवस्था; सलग दुसऱ्या दिवशी एसटी सेवा बंद

रत्नागिरी :

संगमेश्वर तालुक्यात झालेल्या पावसामुळे शास्त्रीपूल-डिंगणी रस्त्याची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाली आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी निर्माण झालेल्या खराब परिस्थितीमुळे वाहतुकीला अडथळे निर्माण झाले असून, एसटी सेवा सलग दुसऱ्या दिवशीही बंद राहिली आहे. त्यामुळे या मार्गावरील ग्रामीण भागातील नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे.पावसामुळे शास्त्रीपूल-डिंगणी मार्गाची अवस्था अत्यंत खराब झाली आहे. रस्त्यावरून वाहने चालविणे कठीण बनले असून, प्रवाशांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. रस्त्याच्या दुरवस्थेमुळे एसटी महामंडळाने या मार्गावरील बसफेऱ्या बंद ठेवल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय होत



आहे.विशेषतः शाळा-महाविद्यालयांत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना या परिस्थितीचा फटका बसत आहे. एसटी सेवा बंद असल्याने विद्यार्थ्यांना शैक्षणिक कामासाठी ये-जा करताना पर्यायी वाहतुकीचा आधार घ्यावा लागत आहे. ग्रामीण भागातील नागरिकांनाही बाजारपेठ, रुग्णालये आणि शासकीय कार्यालयांमध्ये जाण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागत आहे.

दिवाळी फराळातील भेसळीवर कठोर कारवाई; FDA आयुक्तांचा इशारा

पुणे :

दिवाळीच्या फराळात भेसळ आढळल्यास नागरिकांनी तातडीने अन्न व औषध प्रशासनाच्या (FDA) पोर्टलवर तक्रार दाखल करावी, असे आवाहन एफडीएचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी केले आहे. भेसळखोरांविरोधात कठोर कारवाईचा इशाराही त्यांनी दिला. पुण्यातील द पूना मर्चंट्स चेंबरच्या लाडू-चिवडा विक्रीचे उद्घाटन मुंढे यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी सणासुदीच्या काळात अन्नपदार्थांच्या गुणवत्तेची तपासणी आणि भेसळविरोधी मोहिमेबाबत माहिती दिली कार्यक्रमानंतर माध्यमांशी संवाद साधताना मुंढे यांनी सांगितले की, द पूना मर्चंट्स चेंबरच्या लाडू-चिवडा विक्रीचे उद्घाटन करण्यापूर्वी एफडीएकडून संबंधित पदार्थांची गुणवत्ता तपासण्यात आली होती. गुणवत्तेविषयीच्या सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच त्यांनी कार्यक्रमाला उपस्थिती लावली. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर एफडीएकडून सणाच्या २१ दिवस आधीपासून ते सणानंतर ३० दिवसांपर्यंत चार टप्प्यांत विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

देहूगावातील वृंदा गुरुकुल फाउंडेशनतर्फे शिक्षक-कर्मचाऱ्यांना दिवाळी बोनस व भेटवस्तू

देहूगाव :

सणासुदीच्या आनंदात आपल्या सहकाऱ्यांचाही सहभाग असावा आणि त्यांच्या कामाची दखल घेतली जावी, या उद्देशाने वृंदा गुरुकुल फाउंडेशनच्या वतीने दिवाळीनिमित्त संस्थेतील शिक्षक व कर्मचाऱ्यांना बोनस आणि भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष उद्धव होळकर आणि संस्थापक संचालक प्रा. रुपेश फोंडे उपस्थित होते. यावेळी वृंदा गुरुकुल प्री-प्रायमरी स्कूलच्या प्राचार्या सौ. सुरेखा भराडे, समन्वयक सौ. अश्विनी जेजुरकर, सौ. अंजली, सौ. सोनाली यादव, सौ. रूपाली जाधव, सौ. माधुरी पाटील यांच्यासह संस्थेतील शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी प्रा. रुपेश फोंडे यांनी संस्थेच्या उभारणीपासून आजवरच्या वाटचालीत शिक्षक व कर्मचाऱ्यांनी दिलेल्या योगदानाचे कौतुक केले. संस्थेची प्रगती ही प्रत्येक सहकाऱ्याच्या मेहनतीतून होत असते. शिक्षक आणि कर्मचारी हे संस्थेचे महत्त्वाचे बळ असून त्यांच्या कार्याचा सन्मान करणे ही संस्थेची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.

वृंदा गुरुकुल फाउंडेशनच्या माध्यमातून देहूगाव, येलवाडी व परिसरात प्री-प्रायमरी स्कूल, अकॅडमी, स्किल डेव्हलपमेंट सेंटर आणि अभ्यासिका असे विविध शैक्षणिक उपक्रम राबविले जातात. विद्यार्थ्यांना माफक शुल्कात दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्यावर संस्थेचा भर आहे. अबॅकस, स्पोकन इंग्लिश, जर्मन भाषा, व्यक्तिमत्त्व विकास आणि शिक्षक प्रशिक्षण असे



अभ्यासक्रमही संस्थेमार्फत चालविले जातात. विविध शाळांमध्ये शिक्षक प्रशिक्षण व शैक्षणिक मार्गदर्शनाचे उपक्रम राबविले जात आहेत.

अभ्यासिकेच्या माध्यमातून गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना कमी शुल्कात अभ्यासासाठी शांत व पोषक वातावरण उपलब्ध करून दिले जात आहे. शिक्षणाबरोबरच सामाजिक बांधिलकी जपत संस्थेच्या वतीने रक्तदान शिबिरे, आरोग्यविषयक उपक्रम, वृक्षारोपण आणि पर्यावरण संवर्धनाचे कार्यक्रमही आयोजित केले जातात.

भविष्यात संस्थेच्या शैक्षणिक व कौशल्य विकास उपक्रमांचा विस्तार विविध भागांत करण्याचा मानस असून, अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत गुणवत्तापूर्ण शिक्षण पोहोचविणे आणि आत्मविश्वासू, स्वावलंबी व संस्कारक्षम पिढी घडविणे हे संस्थेचे उद्दिष्ट असल्याचे प्रा. फोंडे यांनी सांगितले.

यावेळी शिक्षक व कर्मचाऱ्यांनी संस्थेने काम करण्यासाठी दिलेल्या संधी व सहकार्याबद्दल समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री. जितेंद्र गुणवंत यांनी केले.